MHPU090066112026

**सं.फौ.ख.क्र. ३१६०/२०२६**

**निशाणी क्र. :- ०२**

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७४ अन्वये**

**(समक्ष न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग, पिंपरी)**

**१.** गुन्हा घडल्याचा दिनांक :– १९/०८/२०२६

**२.** गुन्हा नोंदणी दिनांक :– २०/०८/२०२६

**३.** तक्रारदाराचे नाव, वय व अधिवास:– महाराष्ट्र सरकारद्वारा पोलीस शिपाई प्रतिक संभाजी कवडे, ३८९४, चिखली पो.स्टे.

**४.** आरोपीचे नाव, वय व अधिवास :– मनोज काशिनाथ ठाकरे, वय – ३२ वर्षे, धंदा– दुकान, रा. रिव्हर सो., चिखली, पुणे

**५.** गुन्हयाचा तपशिल :–

असे की दि.१९/०८/२०२६ रोजी दुपारी २.०० वा. सुमारास विश्वकल्याण इंग्लीश मेडियम स्कुलच्या बाजुला, ठाकरे बंधू चहा नाश्ता सेंटरमध्ये तुम्ही धुम्रपान करण्यासाठी सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीकरता ठेवलेले मिळून आलात, त्यामुळे तुम्ही सिगारेट व तंबाखू उत्पादने, जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य, उत्पादन पुरवठा आणि वितरण नियमन अधिनियम २००३ चे कलम ६(ब), २४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

याद्वारे आपल्याविरुध्द संपरिक्षा घेण्यात आली.

## आरोपीचे निवेदन

**प्रश्न १.** तुम्हाला तक्रारीच्या कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय ?

**उत्तर :–** होय.

**प्रश्न २.** आता वाचुन दाखविण्यात आलेला आरोपाचा तपशिल तुम्हाला समजला काय ?

**उत्तर:–** होय.

**प्रश्न ३.** तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

**उत्तर:–** होय.

......................

(आरोपीची सही)

TEJASWINI SANDEEP MAHADIK Digitally signed by TEJASWINI SANDEEP MAHADIK Date: 2026.08.21 18:00:42 +0530

( टी.एस.महाडीक )

दि. २१/०८/२०२६ **न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग, पिंपरी**

## न्यायनिर्णय

## (दि.२१/०८/२०२६ रोजी घोषित)

आज रोजी आरोपी न्यायालयात स्वतःहून हजर झाला. आरोपीस त्यांच्याविरुध्द असलेल्या गुन्हयाचे स्वरुप मराठीत वाचून सांगितले. आरोपीने गुन्हा कबूल असल्याचे मान्य केले. त्याचप्रमाणे आरोपीने प्रमाणे गुन्हा कबूल असल्याबाबत लिहुन दिले त्यामुळे आरोपी हा कुठल्याही दबावाला बळी न पडता स्वतःहून गुन्हा कबूल करीत आहे याची खात्री झाली. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. आरोपी मनोज काशिनाथ ठाकरे यास सिगारेट व तंबाखू उत्पादने, जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य, उत्पादन पुरवठा आणि वितरण

नियमन अधिनियम २००३ चे कलम ६(ब), २४ नुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २७५ अन्वये २००/– रुपये (अक्षरी दोनशे रुपये मात्र) दंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे, जर आरोपीने पैसे भरले नाहीत तर त्यास दोन दिवसांचा तुरुंगवास देण्यात येईल.

TEJASWINI SANDEEP MAHADIK
Digitally signed by TEJASWINI SANDEEP MAHADIK
Date: 2026.08.21 18:00:49 +0530

( टी.एस.महाडीक )

**दि. २१/०८/२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग, पिंपरी**